| | |
|---|---|
| भाग –'अ'<br>(न्यायनिर्णयाचे शिर्श पृष्ठ)<br>(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (२)) | |
| MHWS010000892025 | **अतिरीक्त सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे न्यायालय**<br>(पीठासीन अधिकारी, श्रीमती व्ही.डी.इंगळे)<br>(न्यायनिर्णय दि.१६/०६/२०२६)<br><br>सत्र खटला क्र.५/२०२५<br>निशाणी क्र. १५६ |
| | प्रथम खबरी अहवाल/गुन्हा व पोलीस ठाणेचा तपशील.<br>अपराध क्र.२९९/२०२४, पोलीस ठाणे मालेगांव, ता.मालेगांव, जि.वाशिम. |
| तक्रारदार/फिर्यादी | **महाराष्ट्र शासन तर्फे,**<br>पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे, मालेगांव,<br>ता.मालेगांव, जि.वाशिम. |
| प्रस्तुतकर्ता | सहाय्यक सरकारी अभियोक्ता,<br>श्रीमती एस.पी.कुलकर्णी |
| आरोपी | **१. शब्बीर बेग दौलत बेग**<br>वय ४५ वर्ष,  व्यवसाय– मजुरी<br>**२. अफरोज खा हबीब खा**<br>वय ४५ वर्ष,  व्यवसाय– शेती<br>**३. चांद खा मिया खा**<br>वय २६ वर्ष,  व्यवसाय– मजुरी |

| | |
|---|---|
| | **४. मेहमुद बेग दौलत बेग**<br>वय ४० वर्ष, व्यवसाय– मजुरी<br>**५. रफीक बेग दौलत बेग**<br>वय ३५ वर्ष, व्यवसाय– मजुरी<br>**६. जमीर बेग दौलत बेग**<br>वय ४५ वर्ष, व्यवसाय– मजुरी<br>**७. शेख समीर शेख अब्दुल्ला**<br>वय ३२ वर्ष, व्यवसाय– मजुरी<br>**८. समीर बेग मिर्झ हयात बेग मिर्झा**<br>वय ३० वर्ष, व्यवसाय– मजुरी<br>**९. आसीफ खान हमीद खान**<br>वय २७ वर्ष, व्यवसाय– मजुरी<br>**१०. रहीसा बी जमीर बेग**<br>वय ३५ वर्ष, व्यवसाय– मजुरी<br>**११. मीना बी शब्बीर बेग**<br>वय ३५ वर्ष, व्यवसाय– मजुरी<br>**१२. दौलत बेग शेरु बेग मिर्झा**<br>वय ७५ वर्ष, व्यवसाय– मजुरी<br>**१३. सुलताना बी रहीम शेख**<br>वय ३२ वर्ष, व्यवसाय– मजुरी<br>**१४. अयान खान एजाज खान**<br>वय १९ वर्ष, व्यवसाय– नमुद नाही<br>आरोपी क्र.१ ते १३ राहणार चिवरा,<br>ता.मालेगांव, जि.वाशिम.<br>आरोपी क्र.१४ राहणार आलेगांव,<br>ता.पातुर, जि.अकोला. |
| **प्रस्तुतकर्ता** | विधीज्ञ श्री.पी.डी.वानरे |

**भाग–'ब'**

**(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (२))**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २४/०६/२०२४ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | २४/०६/२०२४ |
| दोषारोपपत्राची तारीख | २०/१२/२०२४ |
| दोषारोप ठेवण्यात आल्याची तारीख | ११/१२/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०२/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयाकरीता राखीव केल्याची तारीख | --- |
| न्यायनिर्णयाची तारीख | १६/०६/२०२६ |
| शिक्षेची तारीख, असेल तर | --- |

**आरोपींचा तपशील**

| अ. क्र. | आरोपींचे नांव | अटक तारीख | जमानत तारीख | गुन्हयाचे विवरण | शिक्षा किंवा निर्दोष | शिक्षेचा कालावधी | फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ४२८ नुसार कारावासाचा अवधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शब्बीर बेग दौलत बेग | २५/०६/२०२४ | ३०/०७/२०२४ | भादंवी कलम १४३, १४७, १४८, ३०७, ३२३, ३२४, | -- | -- | -- |
| २. | अफरोज खा हबीब खा | २५/०६/२०२४ | १८/०७/२०२४ | | -- | -- | -- |
| ३. | चांद खा मिया खा | २५/०६/२०२४ | १८/०७/२०२४ | | -- | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | मेहमुद बेग दौलत बेग | ०४/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | ०४/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | ५०४, ५०६ सह कलम १४९ | -- | -- | -- |
| ५. | रफीक बेग दौलत बेग | ०४/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | ०४/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | | -- | -- | -- |
| ६. | जमीर बेग दौलत बेग | ०४/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | ०४/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | | -- | -- | -- |
| ७. | शेख समीर शेख अब्दुल्ला | २२/०७ /२०२४ अटकपुर्व जामीन | २२/०७ /२०२४ अटकपुर्व जामीन | | -- | -- | -- |
| ८. | समीर बेग मिर्झा हयात बेग मिर्झा | २२/०७ /२०२४ अटकपुर्व जामीन | २२/०७ /२०२४ अटकपुर्व जामीन | | -- | -- | -- |
| ९. | आसीफ खान हमीद खान | २२/०७ /२०२४ अटकपुर्व जामीन | २२/०७ /२०२४ अटकपुर्व जामीन | | -- | -- | -- |
| १०. | रहीसा बी जमीर बेग | ०२/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | ०२/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | | -- | -- | -- |
| ११. | मीना बी | ०२/०८ | ०२/०८ | | -- | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | शब्बीर बेग | /२०२४ अटकपुर्व जामीन | /२०२४ अटकपुर्व जामीन | | | | |
| १२. | दौलत बेग शेरु बेग मिर्झा | ०२/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | ०२/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | | -- | -- | -- |
| १३. | सुलताना बी रहीम शेख | ०२/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | ०२/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | | -- | -- | -- |
| १४. | अयान खान एजाज खान | ०४/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | ०४/०८ /२०२४ अटकपुर्व जामीन | | -- | -- | -- |

**भाग–'क'**

**(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (३))**

**सरकारी/आरोपीचे/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी.**

**अ.– सरकारी साक्षीदारः**

| **दर्जा** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| १. | शेख समीर शेख रफीक | फिर्यादी |
| २. | आवेश रफीक शेख | साक्षीदार |
| ३. | रफीक शेख मन्नान | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| ४. | फरीदाबी शेख रफीक | साक्षीदार |
| ५. | वजीरखॉन मीरबाजखॉ | साक्षीदार |
| ६. | माधव तुकाराम पेटकर | साक्षीदार |

**ब.– आरोपींचे साक्षीदारः**

| **दर्जा** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार**<br>**(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क– न्यायालयाचे साक्षीदार**

| **दर्जा** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार**<br>**(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## <u>सरकारी/आरोपीचे/न्यायालयातील निशाणी दस्तऐवज.</u>

**अ.– सरकारी दस्तऐवज**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन.** |
|---|---|---|
| १. | नि.क्र.८१/सा.क्र.१ | रिपोर्ट |
| | नि.क्र.८२/सा.क्र.१ | छापील प्रथम खबर |
| २. | नि.क्र.१०८/सा.क्र.६ | मेडीकल एक्सामिनेशन रिपोर्ट |
| | नि.क्र.१०८/सा.क्र.६ | समज पत्र |
| | नि.क्र.१०९ ते १११ /सा.क्र.६ | अटक पंचनामे |

| | | |
|---|---|---|
| | नि.क्र.११२/सा.क्र.६ | कबुली जबाब |
| | नि.क्र.११३/सा.क्र.६ | जप्ती पंचनामा |
| | नि.क्र.११४/सा.क्र.६ | फिर्यादीच्या जवाबातील अधोरेखांकीत भाग अ |
| | नि.क्र.११५/सा.क्र.६ | शेख आवेजच्या जवाबातील अधोरेखांकीत भाग अ |
| | नि.क्र.११६/सा.क्र.६ | शेख रफीकच्या जवाबातील अधोरेखांकीत भाग अ |
| | नि.क्र.११७/सा.क्र.६ | फरीदाबीच्या जवाबातील अधोरेखांकीत भाग अ |
| | नि.क्र.११८/सा.क्र.६ | वझीरखॉच्या जवाबातील अधोरेखांकीत भाग अ |
| | नि.क्र.११९/सा.क्र.६ | वैद्यकीय अधिकारी मालेगांव यांना पत्र |
| | नि.क्र.१२० ते १२६ /सा.क्र.६ | सात क्युरी रिपोर्ट |
| | नि.क्र.१२७/सा.क्र.६ | मुद्देमाल पावती |
| | नि.क्र.१२८/सा.क्र.६ | उपसंचालक, न्या.स.वै.प्र.अमरावती यांना पत्र |
| | नि.क्र.१२९/सा.क्र.६ | प्र.व.न्या.दं.मालेगांव यांना कलमवाढीचे पत्र |
| | नि.क्र.१३० ते १४० /सा.क्र.६ | अटक पंचनामे |

**ब.– बचावपक्ष दस्तऐवजः**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क.– न्यायालयीन दस्तऐवजः**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | | मान्य केलेले दस्तऐवज. |
| १. | नि.क्र.९४ ते १०१ | जप्ती पंचनामे |

ड.– साहित्य/वस्तूः

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय
(घोषीत दिनांक १६/०६/२०२६)

आरोपींच्या विरुद्ध भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, १४८, ३०७, ३२३, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये संपरीक्षा चालविण्यात आली.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की,

दिनांक २४/०६/२०२४ रोजी फिर्यादी शेख समीर शेख रफिक याने पोलीस ठाणे मालेगांव येथे फिर्याद दिली की, दि.२४/०६/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजताचे सुमारास तो, त्याची आई फरिदा बी, वडील शेख रफीक, फुफा वजीर खान निरबाज खान पठाण, आजी हमीदा बी मन्नान व भाऊ आवेश शेख रफिक ट्रॅक्टर घेऊन शेत पेरण्यासाठी ग्राम चिवरा येथे शेतात गेले असता आरोपी हातात फावडे, लोखंडी रॉड, काठया घेऊन आले. त्यावेळी शब्बीरने हे आमचे शेत आहे, तुम्ही शेत का पेरता असे म्हणुन फिर्यादी व त्याच्या कुटूंबियांना शिवीगाळ केली. आरोपी शब्बीर बेग लोखंडी फावडा घेऊन फिर्यादीच्या वडीलांच्या अंगावर धावला व आज तो इनका काम तमाम करना है, असे म्हणुन जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फावडयाने फिर्यादीच्या वडीलांच्या डोक्यात मारुन त्यांना जखमी केले. फिर्यादी व त्याचे फुफा वजीर खान भांडण सोडविण्यास गेले असता आरोपी जमीर बेग दौलत बेगने रॉडने फिर्यादीस मारहाण केली. आरोपी मोहम्मद बेगने त्याच्या फुफाच्या डोक्यात रॉड मारला. आरोपी रहीसा बी, नाजीरा बी व सुलताना बी यांनी फिर्यादीची आजी हमीदा बेगच्या डोक्यावर काठीने मारहाण केली. आरोपींनी फिर्यादी व त्याच्या कुटूंबास शिवीगाळ करुन लाथाबुक्याने, थापडाने व दगडाने मारहाण केली.

३. सदर फिर्यादवरुन पोलीस ठाणे मालेगांव येथे आरोपीं विरुद्ध अपराध क्र.२९९/२०२४, भारतीय दंड विधान कलम १४७, १४८, १४९, ३०७, ३२४, ५०४, ५०६ नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, आरोपींना अटक केली, फिर्यादी व साक्षीदारांचे जवाब नोंदविले, आरोपींचा कबुली जबाब नोंदविला, जप्ती पंचनामे तयार केले, वैद्यकीय दस्तऐवज हस्तगत केले, तपासा दरम्यान सदर अपराधामध्ये भारतीय दंड विधान कलम ३२३, १४३ ची वाढ होऊन मिळण्याबाबत संबंधित न्यायालयास पत्र दिले. तपासाअंती आरोपीं विरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. भारतीय दंड विधान कलम ३०७ अन्वये येणारा गुन्हा हा केवळ सत्र न्यायालयाद्वारेच विचारणीय आहे. त्यामुळे मालेगांव येथील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालयाने निशाणी क्र.१ खाली आदेश पारीत करुन, सदर खटला सत्र न्यायालयाकडे वर्ग केला.

५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर, मी भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, १४८, ३०७, ३२३, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी, आरोपीविरुद्ध निशाणी क्र.६१ खाली आरोप निश्चित केले. सदरील आरोप आरोपींना वाचून दाखवण्यात आले आणि समजावून सांगण्यात आले; ज्यावर आरोपींनी स्वतःला निर्दोष असल्याचे कथन केले आणि खटला चालविण्याची विनंती केली.

६. आरोपींचे फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ३१३ प्रमाणे बयाण निशाणी क्र. १४२ ते १५५ वर नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांच्या विरुद्ध खोटी केस केल्याचे प्रतिकथन केले आहे.

७. मी खालीलप्रमाणे मुद्दे काढले. त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षासाठीची कारणमिमांसा पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, दिनांक २६/०४/२०२६ रोजी, सकाळी साधारण १०.३० ते ११ वाजण्याच्या सुमारास, चिवरा या गावी सर्व आरोपी हे एका बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते; आणि सदर जमावाचा समान उद्देश हा फिर्यादी/पीडित व्यक्तीवर हल्ला करणे किंवा त्याच्याविरुद्ध गुन्हेगारी बळाचा वापर करणे हा होता, आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम १४३ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपी हे एका बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते आणि सदर जमावाचा समान उद्देश फिर्यादीवर हल्ला करणे किंवा त्याच्यावर गुन्हेगारी बळाचा वापर करणे हा होता, आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम १४७ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ३. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपी हे एका बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते, ज्याचा समान उद्देश फिर्यादीवर जीवघेणा हल्ला करणे हा होता; आणि दंगल घडवून आणण्याचा गुन्हा करताना, आरोपींच्या हाती लोखंडी पाईप व फावडे ही शस्त्रे होती, आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम १४८ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ४. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपी हे एका बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते, आणि जमावाच्या समान उद्दीष्टार्थ आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण केली ज्यामुळे कोणाचा मृत्यू घडवून आणला असता, तर तो खुनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरला असता, आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ३०७ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ५. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपी हे एका बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते, आणि जमावाच्या समान उद्दीष्टार्थ आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना ईच्छापुर्वक मारहाण केली, आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ३२३ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ६. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपी हे एका बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते, आणि जमावाच्या समान उद्दीष्टार्थ आरोपींनी मृत्यूस कारणीभुत ठरु शकणा-या घातक शस्त्राद्वारे फिर्यादी व साक्षीदारांना ईच्छापुर्वक मारहाण केली, आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ७. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपी हे एका बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते, आणि जमावाच्या समान उद्दीष्टार्थ आरोपींनी जाणूनबुजून सार्वजनिक शांतता भंग होईल अशाप्रकारे फिर्यादीस शिवीगाळ करुन त्याचा अपमान केला आणि त्याद्वारे | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | त्याला चिथावणी दिली, आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ५०४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | |
| ८. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी सर्व आरोपी हे एका बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते, आणि जमावाच्या समान उद्दीष्टार्थ आरोपींनी फिर्यादीस जीवाने मारण्याची धमकी दिली, आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ५०६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ९. | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशान्वये. |

## कारणमिमांसा

८. अभियोग पक्षातर्फे श्रीमती. एस.पी. कुलकर्णी आणि आरोपीतर्फे श्री. पी.डी.वानरे यांचा युक्तीवाद ऐकला.

९. आरोपीं विरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणात एकुण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविली. फिर्यादी सा.क्र.१ शेख समीर शेख रफीक याची साक्ष नि.८० वर , सा.क्र.२ आवेश रफीक शेख याची साक्ष नि.क्र.८४ वर, सा.क्र.३ रफीक शेख मन्नान याची साक्ष नि.८५ वर, सा.क्र.४ फरीदाबी शेख रफीक यांची साक्ष नि.क्र.८६ वर, सा.क्र.५ वजीरखॉन मीरबाजखॉ याची साक्ष नि.क्र.८७ वर आणि सा.क्र.६ तपास अधिकारी माधव तुकाराम पेटकर याची साक्ष नि.क्र.१०७ वर नोंदविण्यात आली. अभियोग पक्षाने पुरसिस निशाणी क्र.१४१ दाखल करुन साक्ष पुरावा बंद केला. याशिवाय, अभियोग पक्षाने आपली भिस्त खालील दस्तऐवजांवर ठेवली.

अ.– सरकारी दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन. |
|---|---|---|
| १. | नि.क्र.८१/सा.क्र.१ | रिपोर्ट |
| | नि.क्र.८२/सा.क्र.१ | छापील प्रथम खबर |
| २. | नि.क्र.१०८/सा.क्र.६ | मेडीकल एक्सामिनेशन रिपोर्ट |
| | नि.क्र.१०८/सा.क्र.६ | समज पत्र |
| | नि.क्र.१०९ ते १११ /सा.क्र.६ | अटक पंचनामे |
| | नि.क्र.११२/सा.क्र.६ | कबुली जबाब |
| | नि.क्र.११३/सा.क्र.६ | जप्ती पंचनामा |
| | नि.क्र.११४/सा.क्र.६ | फिर्यादीच्या जवाबातील अधोरेखांकीत भाग अ |
| | नि.क्र.११५/सा.क्र.६ | शेख आवेजच्या जवाबातील अधोरेखांकीत भाग अ |
| | नि.क्र.११६/सा.क्र.६ | शेख रफीकच्या जवाबातील अधोरेखांकीत भाग अ |
| | नि.क्र.११७/सा.क्र.६ | फरीदाबीच्या जवाबातील अधोरेखांकीत भाग अ |
| | नि.क्र.११८/सा.क्र.६ | वझीरखॉच्या जवाबातील अधोरेखांकीत भाग अ |
| | नि.क्र.११९/सा.क्र.६ | वैद्यकीय अधिकारी मालेगांव यांना पत्र |
| | नि.क्र.१२० ते १२६ /सा.क्र.६ | सात क्युरी रिपोर्ट |
| | नि.क्र.१२७/सा.क्र.६ | मुद्देमाल पावती |
| | नि.क्र.१२८/सा.क्र.६ | उपसंचालक, न्या.स.वै.प्र.अमरावती यांना पत्र |
| | नि.क्र.१२९/सा.क्र.६ | प्र.व.न्या.दं.मालेगांव यांना कलमवाढीचे पत्र |
| | नि.क्र.१३० ते १४० /सा.क्र.६ | अटक पंचनामे |

**क.– न्यायालयीन दस्तऐवजः**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | | मान्य केलेले दस्तऐवज. |
| १. | नि.क्र.९४ ते १०१ | जप्ती पंचनामे |

१०. बचाव पक्षाने आपल्या बचावार्थ एकाही साक्षीदाराची साक्ष नोंदविली नाही.

**मुद्दे क्रमांक १ ते ९ साठीः–**

११. मुद्दे क्रमांक १ ते ८ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते चर्चेसाठी एकत्रीत घेतले आहेत.

१२. सर्वप्रथम ईथे नमुद करावेसे वाटते की, पिडीत फिर्यादी तथा जखमी साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे घटना घडल्याचे नाकारुन अभियोग पक्षास समर्थन दिले नाही. त्यामुळे तपासण्यात आलेले मुख्य साक्षीदार म्हणजे फिर्यादी सा.क्र.१ शेख समीर शेख रफीक, सा.क्र.२ आवेश रफीक शेख, सा.क्र.३ रफीक शेख मन्नान, सा.क्र.४ फरीदाबी शेख रफीक व सा.क्र.५ वजीरखॉन मीरबाजखॉ याची साक्ष अभियोग पक्षास किंचीतही उपयोगी ठरत नाही. त्यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी आरोपींसोबत त्यांची शेताच्या कारणावरुन बोलचाल झाल्याचे मान्य केले, परंतु त्यांनी आरोपींनी फावडे, लोखंडी रॉड, काठयांनी त्यांना मारहाण केली ही बाब स्पष्टपणे नाकारली आहे. त्यामुळे सदर साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षास उपयुक्त ठरली नाही.

१३. सा.क्र.६ तपासी अधिकारी माधव पेटकर यांची साक्ष तपाससंबंधीत असुन औपचारीक स्वरुपाची साक्ष आहे. त्यांच्या साक्षीवरुन त्यांनी तपास कशाप्रकारे केला याचे आकलन होते.

१४. अभियोग पक्षाच्या वरील पुराव्यांचे अवलोकन केले असता असे निर्दीष्ट होते की, प्रस्तुत खटल्यातील अतिशय महत्वपुर्ण साक्षीदार जखमी तथा फिर्यादी व ईतर जखमी साक्षीदारांनी अभियोग पक्षाला समर्थन दिले नाही. त्यांच्या साक्षीतुन आरोपीं विरुद्धचे आरोप सिद्ध होऊ शकत नाहीत. अभियोग पक्षाने वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष नोंदविली नाही. अभिलेखावर दाखल वैद्यकीय दस्तऐवजावरुन जखमींना झालेल्या जखमा हया आरोपींद्वारेच झाल्याचे पुराव्याअभावी सिद्ध होऊ शकले नाही. एकंदरीत, अभियोग पक्ष आरोपीं विरुद्धचे अपराध संशयापलीकडे सिद्ध करु न शकल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. अशा परिस्थितीत मी मुद्दे क्रमांक ०१ ते ०८ चे उत्तर नकारार्थी नोंदविले आणि अंतिम निष्कर्षासाठी असलेल्या मुद्दा क्रमांक ०९ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ शब्बीर बेग दौलत बेग, २. अफरोज खा हबीब खा, ३. चांद खा मिया खा, ४. मेहमुद बेग दौलत बेग, ५. रफीक बेग दौलत बेग, ६. जमीर बेग दौलत बेग, ७. शेख समीर शेख अब्दुल्ला, ८. समीर बेग मिर्झ हयात बेग मिर्झा, ९. आसीफ खान हमीद खान, १०. रहीसा बी जमीर बेग, ११. मीना बी शब्बीर बेग, १२. दौलत बेग शेरु बेग मिर्झा, १३. सुलताना बी रहीम शेख आणि आरोपी क्र. १४. अयान खान एजाज खान यांना भारतीय दंड संहीतेच्या कलम १४३, १४७, १४८, ३०७, ३२३, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये दंडनीय अपराधातुन, फौजदारी प्रक्रीया संहीता कलम २३५ (१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे जात मुचलके व जामीनकदबे रद्द करण्यात येतात. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ४३७(अ) अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये २५,००० /- (पंचवीस हजार रुपये फक्त) चे जामीन बंधपत्र सादर करावे. |
| ४. | जप्त मुद्देमाल, एक लोखंडी फावडा, एक ओबडधोबड दगड, दोन बांबूच्या |

| | |
|---|---|
| | काठया, दोन लोखंडी रॉड, एक काळी मुठ असलेला चाकू आणि शर्ट, पँट, फुलपँट आदी हे मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावे. |
| | (न्यायनिर्णय खुल्या कक्षात घोषीत करण्यात आला.) |

VAISHALI DAMODAR INGLE

Digitally signed by VAISHALI DAMODAR INGLE
Date: 2026.06.16 16:43:03 +0530

(व्ही.डी.इंगळे)

दि.१६/०६/२०२६ अतिरीक्त सत्र न्यायाधीश, वाशिम.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | R.R.Bharad, Stenographer (Grade-I) |
| Name of Court | :- | Smt.V.D.Ingle<br>District Judge-2 and Additional Sessions Judge, Washim. |
| Date of Judgment/ Order | :- | 16/06/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | :- | 16/06/2026 |
| Judgment/Order uploaded on | :- | 16/06/2026 |